श्रीमती नानकीबाई वाधवाणी कला महाविद्यालय,यवतमाळ

शैक्षणिक सत्र-२०२६-२७

एक दिवसीय मतदार नोंदणी शिबिर कार्यक्रम

दिनांक -७ आक्टोबर,२०२६

देशाच्या प्रातिनिधिक लोकशाही व्यवस्थेत निवडणूक प्रक्रिया अत्यंत महत्वाची असते.जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधिंमार्फत देशाचा राज्यकारभार चालविला जातो.स्थानिक शासनापासून तर देशाच्या केंद्रिय शासनाच्या प्रतिनिधींची निवड जनतेकडून प्रत्यक्ष निवडणूकीच्या माध्यमातून होते देशाचा नागरिक म्हणनू व्यक्तीचा सर्वांगिण विकास साध्य करण्यासाठी जनतेला सामजिक आणि राजकीय अधिकार प्रदान केलेले असतात.या अधिकारांच्या माध्यमातून व्यक्तीचा सर्वांगिण विकास साध्य होतो.देशाच्या सर्वांगिण विकासात आजच्या युवकांची अत्यंत महत्वाची भूमिका आहे.महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना आपल्या अधिकार आणि कर्तव्याची जाणिव असणे आवश्यक आहे.या उददेश्याने आणि उपविभागीय अधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी यवतमाळ यांच्या आदेशान्वये महाविद्यालयाच्या वतीने एक दिवसीय मतदार नोंदणी शिबिर कार्यक्रमाचे आयोजन दिनांक ७ आक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता करण्यात आले मा.श्री.राजेश कहारे,साहेब नायब तहसिलदार,तहसिल कार्यालय यवतमाळ,मा पूजा मनोहर गवई मॅम,तालुका कृषी अधिकारी यवतमाळ,मा.स्वाती रमेश शेवाळे,कनिष्ठ अभियंता यवतमाळ प्रमुख मार्गदर्शक म्हणून मतदार नोंदणी शिबिर कार्यक्रमाला उपस्थित होते. तसेच मा.प्राचार्या डॉ. संगीता वेनुरकर मॅम,प्रा.डॉ.निखिलेश नलोडे महाविद्यालयीन नॅक समन्वयक प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते.

आपल्या देशातील नागरिकांना मिळालेला मतदानाचा अधिकार हा लोकशाही व्यवस्था बळकट करण्यासाठी महत्वपूर्ण आहे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी याबाबत जागरूक असणे अत्यंत आवश्यक आहे.१ आक्टोबर २०२६ रोजी ज्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची वयवर्षे १८ वर्षे पूर्ण झालेली आहे अशा विद्यार्थ्यांच्या मतदार नोंदणीबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन प्रमुख वक्ते आणि मार्गदर्शक मा.राजेश कहारे साहेब यांनी केले. समाजाचा महत्वपूर्ण घटक म्हणून आणि देशाचा नागरिक म्हणून भारतीय संविधानाने प्रदान केलेल्या मूलभूत अधिकाराबाबत तसेच राजकीय अधिकाराबाबत जागरूक असणे आवश्यक आहे.आपल्याला प्राप्त असलेल्या अधिकारासोबतच लोकशाही शासनव्यवस्थेत देशाप्रति आपल्या कर्तव्याची जाणिव आपणास असावयास पाहिजे असे मत प्रास्ताविक सादर करतांना प्रा.डॉ.कल्पना एस.गोडघाटे राज्यशास्त्र विभाग प्रमुख यांनी व्यक्त केले. मतदार नोंदणी टिम मधील सदस्यांनी विद्यार्थ्यांना मतदार नोंदणी बाबत माहिती दिली ऑनलाइन मतदार नोंदणी कशा पध्दतीने करावयाची याबाबत मार्गदर्शन केलेत.आणि मतदार नोंदणी वयवर्षे १८ वर्षे पूर्ण असणा-या विद्यार्थ्यांची ऑनलाईन नोंदणी करण्यात आली तसेच विद्यार्थ्यांना मतदार नोंदणीबाबत मार्गदर्शन करण्यात आले. मा.पूजा गवई मॅम,आणि मा.स्वाती शेवाळे मॅम यांनी मतदानाचा अधिकार, निवडणूक प्रक्रिया,लोकशाही व्यवस्थेत मतदानाच्या अधिकाराचे महत्व याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. .एक दिवसीय मतदार नोंदणी शिबिर कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि आभार प्रा.डॉ.कल्पना एस.गोडघाटे यांनी व्यक्त केले.महाविद्यालयातील विद्यार्थी प्राध्यापक वृंद आणि शिक्षकेत्तर कर्मचारी कार्यक्रमाला उपस्थित होते.कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ. जयंत चतूर यांचे मार्गदर्शन मिळाले.

श्रीमती नानकीबाई वाधवाणी कला महाविद्यालय,यवतमाळ

शैक्षणिक सत्र-२०२६-२७

एक दिवसीय मतदार नोंदणी शिबिर कार्यक्रम

दिनांक -७ आक्टोबर,२०२६



मतदार नोंदणी शिबिर कार्यक्रमातील टीम सदस्य विद्यार्थ्यांचे मतदार नोंदणी करीत असताना



श्रीमती नानकीबाई वाधवाणी कला महाविद्यालय,यवतमाळ

शैक्षणिक सत्र-२०२६-२७

एक दिवसीय मतदार नोंदणी शिबिर कार्यक्रम

दिनांक -७ आक्टोबर,२०२६



एक दिवसीय मतदार नोंदणी शिबिर कार्यक्रमाचे प्रास्ताविक सादर करताना प्रा.डॉ.कल्पना एस.गोडघाटे



एक दिवसीय मतदार नोंदणी शिबिर कार्यक्रमाला मार्गदर्शन करताना मा.श्री.राजेश कहारे साहेब

नायब तहसिलदार ,तहसिल कार्यालय यवतमाळ